# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 01.05.2024** **वार: बुधवार**

---

**महाराष्ट्र दिन**

महाराष्ट्रातल्या समाजसुधारकांमुळे सामाजिक क्रांती घ डली, या भूमीतल्या महामानवांनी देशाला सत्यशोधक विचार दिला आहे. त्यामुळेच सर्वांना सोबत घेऊन सुसंस्कृत, प्रगत महाराष्ट्र घडवायचा आहे, असं प्रतिपादन पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज पुण्यात केलं. महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६४ वा वर्धापन दिन आणि कामगार दिन यानिमित्त पुण्यातल्या शिवाजी नगर पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी पोलिस दलातील विविध पथकांनी त्यांना मानवंदना दिली. जिल्हाधिकारी सुहास दिवसे यावेळी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी इथल्या मुख्यालयातही पालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी पालिकेचे विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं.

**मराठी भाषा भवन**

महाराष्ट्र दिनाचं औचित्य साधून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठी भाषा भवनाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या हस्ते करण्यात आलं. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉक्टर पंडीत विद्यासागर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मराठी भाषा भवन निर्मिती ही मराठी भाषेच्या इतिहासातली महत्त्वाची घटना असल्याचं मत विद्यासागर यांनी यावेळी व्यक्त केलं.

**ससून अधीक्षक**

ससून रुग्णालयाच्या अधीक्षकपदी रुग्णालयातल्या स्त्रीरोग विभागाच्या प्रमुख डॉक्टर सविता कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काही दिवसांपुर्वी रुग्णाला उंदीर चावल्याप्रकरणी तत्कालीन अधीक्षकांचं निलंबन करण्यात आलं होतं.

**वन पाणी टंचाई**

पुणे जिल्हा परिसरातल्या दौंड, बारामती, इंदापूर, सासवड, भोर, नसरापूर आणि वेल्हे तालुक्यातल्या संरक्षित वनक्षेत्रात तीव्र पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. कृत्रिम पाणवठ्यात टँकरने पाणी भरण्याचा खर्चही जवळपास दुप्पट झाला आहे. जिल्ह्यात नैसर्गिक स्रोत आटल्यानं वनविभागाकडून वनक्षेत्रात ४०० पाणवठे तयार करण्यात आले आहेत. त्यांच्या पाणीपुरवठ्यासाठी दीड लाखाहून अधिक निधी खर्च झाला असल्याचं आमच्या बातमीदारानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**१२पेटंट-राजेंद्र**

खडकी शिक्षण संस्थेच्या टिकाराम जगन्नाथ कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातल्या नऊ प्राध्यापकांनी एकाच दिवशी विविध विषयांवरील नाविन्यपूर्ण १२ पेटंट मुंबईच्या बौद्धिक संपदा कार्यालयात दाखल केली आहेत. या दुर्मिळ घटनेमुळे अन्य तरुणांना, प्राध्यापकांना प्रेरणा मिळेल अशी प्रतिक्रिया सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. अरुण अडसूळ व्यक्त केली. या सर्व प्राध्यापकांचा संस्थेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते आज महाराष्ट्रदिनी महाविद्यालयाच्या वतीनं गौरव करण्यात आला. पुणे वृत्त विभागाचे हंगामी वृत्तनिवेदक प्राध्यापक राजेंद्र लेले यांच्या दोन पेटंटचा यामध्ये समावेश आहे.

**अस्थिरोग**

पुणे अस्थिरोग संस्था आणि महाराष्ट्र अस्थिरोग संघटना यांच्यावतीनं आजपासून अस्थिरोग जनजागृती सप्ताहाची सुरुवात झाली. त्यानिमित्त शहरातली रुग्णालये, अस्थिरोग रुग्णालयांमध्ये मोफत तपासणी आणि मार्गदर्शन शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. रुग्णांसाठी काही सांधे शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असल्याचं पुणे अस्थिरोग संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर अर्जून विगास यांनी सांगितलं.

**रेल्वे**

उन्हाळी सुट्ट्यांमुळे होणारी गर्दी टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या सुरू केल्या आहेत. त्यात पुण्यातून दौंड मार्गे अजमेर या साप्ताहिक उन्हाळी विशेष गाडीच्या वीस फेऱ्या सोडण्यात येणार आहे. दर सोमवारी दौंड येथून रात्री १० वाजून १० मिनिटांनी ही गाडी सुटून दुसऱ्या दिवशी रात्री आठ वाजून ३५ मिनिटांनी अजमेरला पोहोचेल.

**पुणे क्रीडा मोहोळ**

खेलो इंडियाच्या धर्तीवर पुणे शहरातही क्रीडा प्रकारांसाठी अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देत आंतरराष्ट्रीय खेळाडू घडवण्याला प्राधान्य देऊ असं मत महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केलं. पुणे स्पोर्टस असोसिएशन आणि फिटनेस प्रेमी पुणेकरांच्या वतीनं पुणे स्पोर्टस् कॉनक्ल्वेह चं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी मोहोळ बोलत होते.

**मावळ वाघेरे पाटील**

मावळ लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी घरोघरी जाऊन मतदारांशी चर्चा करत प्रचार केला. मतदारसंघातले प्रश्न सोडवण्यासाठी म्हणून विजयी करण्याचं आवाहन त्यांनी मतदारांना केलं.

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटना मान्यताप्राप्त कॅप्टन शिवरामपंत दामले करंडकर १४ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात क्रिकेट नेक्स्ट अकॅडमी आणि आर्यन्स क्रिकेट अकॅडमी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र राहिलं. कमाल तापमान ४० अंश होतं तर किमान तापमानाची नोंद २५ पूर्णांक ३ दशांश अंश झाली. उद्याही आकाश निरभ्र राहून कमाल तापमानात दोन अंशांची घट होण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**